# ......परत एकदा मंडल आयोग, आढावा आवश्यक

भारतीय संविधानामध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे कलम ३४० मागासवर्गीयांच्या स्थितीचे अन्वेषक करण्यासाठी आयोगाची नियुक्ती करण्यासाठी आणि त्यायोगे भारताच्या राज्य क्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या वर्गाच्या स्थितीचे व त्यांना अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघ राज्याने केव्हा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाय योजना कराव्या, यासाठी शिफारशी करण्यास सांगण्यात आले. २६ जानेवारी १९५० साली आपण संविधान स्विकारल्यानंतर १९५३ साली काका काळेलकर आयोग नेमण्यात आला होता. आणि त्या आयोगाने ज्या शिफारशी केल्या त्याच आयोगाने अमंलबजावनी करणे शक्य होणार नाही असा शेरा मारून आयोग संपूष्टात आणला. परत १९७८ साली जनता दलाच्या काळात आयोग नेमण्यात आला आणि १९८० साली या आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला. या आयोगाने अनेक शिफारशी केल्या होत्या परंतू त्यापैकी फक्त २७ टक्के आरक्षण शिक्षण आणि सेवेमध्ये देण्यात आल्या. त्यालाही १९९३ साल उजाडले होते म्हणजेच ४३ वर्षानंतर कलम ३४० ची अमंलबजावणी झाली. याच आयोगाने आपल्या शिफारशीमध्ये असे म्हटले होते की, या आयोगाची शिफारशी झाल्यानंतर २० वर्षांनी आढावा घेण्यात यावा. आता ती वेळ आलेली आहे. कारण या देशामध्ये भटके विमुक्त हा जो समाज आहे ज्या लोकांनी स्वातंत्र्याच्या लढयात आहूती दिली आणि इंग्रजांना सळो की पळो करून सोडलं आणि त्यामुळे इंग्रजांनी त्यांच्यासाठी १८७१ साली क्रूर कायदा पास करून त्यांना गुन्हेगार समाज ठरविण्यात आले. आणि इतरांसाठी वेगळा कायदा आणि या समाजासाठी वेगळा कायदा करून त्यांना त्यांचे हक्क डावलण्यात आले. आजही देशभर हा समाज किडया मुंग्याच जीवन जगत आहे.

मंडल आयोगाने ज्यावेळेस शैक्षणिक, सामाजीक आणि आर्थिकदृष्टया मागासलेले कोण यांचा अन्वेषण केल त्यावेळेस भटक्या-विमुक्त हा घटक अत्यंतीक मागास असल्याचे आढळून आले आणि म्हणून आयोगाने आपल्या शिफारशीमध्ये सांगितलं की, हा घटक एससी, एसटी प्रमाणेच अत्यंत दबलेला वंचित घटक आहे आणि मागासवर्गियामध्ये सर्वात शेवटचा घटक आहे. कारण इतर मागसवर्गियांना १८ ते २१ गुण मिळाले होते तर यांना ११ ते १३ गुण मिळाले व त्यामुळे मंडल आयोगाने आपल्या शिफारशीमध्ये असे सांगितले की, भटका - विमुक्त समाज हा आमच्या कार्यकक्षेत जरी येत नसला तरीपण त्यांची दयनीय स्थिती बघून आम्ही त्यांना मंडल

आयोगाच्या कार्यकक्षेत ओबीसीच्या केंद्रीय सूचीमध्ये समाविष्ट करून घेत आहोत. शिफारशीच्या अनुच्छेद (१३.३७) मध्ये अशी शिफारस केली आहे की, भटक्या विमुक्ताने अत्यंतमागास जातींना भारत सरकारने त्या त्या राज्याच्या अनुषंगाने एससी किंवा एसटी मध्ये समाविष्ट करून घ्यावे. ओबीसीमध्ये घालण्याची ही शिफारस भटक्या विमुक्तांच्या भल्यासाठी होती असे जरी वरवर दिसत असले तरी यामुळे भटक्या विमुक्तांचा घात झाला आणि राज्यकर्त्यांनी आणि उच्च पदस्थ असलेल्या अधिकारी व लोकप्रतिनिधींनी गेले २० वर्ष फार मोठा सामाजीक भ्रष्टाचार केला. तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी प्रामाणिकपणे मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या आणि लागूही केल्या. परंतू त्याच आयोगाचे एक सदस्य एल.आर.नाईक यांनी त्यांच्या डिसेन्ट नोटमध्ये स्पष्टपणे, शिफारस केली होती की, भटक्या विमुक्तांना वेगळे आरक्षण दया. त्यांनी मागासवर्गीय १५ टक्के आणि अत्यंत मागासवर्गीयांना १२ टक्के असे विभाजन २७ टक्के ओबीसी आरक्षणाचे करावे अशी शिफारस केली होती. परंतू त्याकडे दूर्लक्ष करण्यात आले. इंदिरा शहाणी विरूध्द भारत सरकार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने हाच धागा पकडून ओबीसीचे दोन किंवा तीन ठिकाणी विभाजन करावे असे सूचीत केले. आणि आता राष्ट्रीय मागासवर्ग आयोग दिल्ली यांनी २७ टक्के ओबीसीचे तीन ठिकाणी विभाजन करावे अशी जोरदार शिफारस केली आहे. आणि म्हणून होत असलेला सामाजिक भ्रष्टाचार रोखायचे असेल तर विभाजन करणे आवश्यक झाले आहे. कारण देशामध्ये १८ टक्के भटका विमुक्त समाज आहे. आणि राज्यामध्ये २२ टक्के आहे. परंतू केंद्रीय स्थळावर आएएस, आयपीएस या सेवेमध्ये या समाजाची संख्या अर्धा टक्काही नाही. भारतीय संविधानामध्ये सामाजीक, आर्थिक आणि राजनिती न्याय देण्याचे आश्वासन उददेशिकामध्येच देण्यात आले होते. परंतू आज हे संविधान कूचकामी ठरले आहे. कारण राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती या समाजाला न्याय देण्याची नाही. या संदर्भात सांविधानिक संस्थेचे मत काय होते आणि आहे हे बघूया.

## एल.आर.नाईक यांनी डिसेंन्ट नोटमध्ये मांडलेले मत-

श्री.नाईक यांचे असे मत होते की, २७ टक्के आरक्षण सरसकट न देता राज्यांच्या या मागासवर्गीयाच्या यादीचे विभाजन करावे. एक मागासवर्गीय व दूसरे दबले गेलेले मागासवर्गीय म्हणजेच प्रगत मागासवर्गीयाच्या तुलनेत अत्यंत मागासलेले वर्ग, त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते की, ओबीसी मधील पुढारलेल्या जाती ओबीसी मधीलच मागे पडलेल्या जातींना पुढे येऊ देत नाहीत. त्यामुळे भविष्यात हे अत्यंत

मागासलेल्या व अत्यंत टोकाच्या मागासलेल्या जाती संघटीत होतील व आपले नेतृत्व आपणच निर्माण करतील. परंतु जर असे झाले नाही तर ओबीसीमधील अत्यंत मागासलेला वर्ग व विमुक्त भटक्या जाती व दबलेले मागासवर्ग केंद्रीय आरक्षणाचा लाभ उठवू शकणार नाहीत.

## मा. सर्वोच्च न्यायालयाचे मत

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार २७ टक्के आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा शहाणी विरूध्द भारत सरकार या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, घटनेच्या कलम १६ (४) या तरतुदीप्रमाणे मागासवर्गीयांचे मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा कोणताही अडथळा नाही असे वर्गीकरण हे सामाजिकदृष्टया किती मागासलेपण आहे त्यावर अवलंबून असावे. विविध मागासवर्गीय यामध्ये समान वाटप होणे हे आवश्यक आहे की, ज्यायोगे एकत्रीकरण होऊन एक वा दोन वर्ग आरक्षणाचा सर्व वाटा स्वत:च घेऊन जाणार नाही.

सदर खटल्याच्या निकालाच्या ८०२ या परिच्छेदाप्रमाणे माननीय न्यायधिशांनी असे मत व्यक्त केले की, मागासवर्गीयांचे, मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे दोन किंवा तीन गट करण्यास घटनेचा किंवा कायद्याचा कोणताही अडथळा नाही. असे वर्गीकरण केलेच पाहीजे असा आग्रह ते धरत नाहीत. मात्र प्रश्नाचे उत्तर देतांना ते इतकेच म्हणतात की, असे वर्गीकरण केल्यास ते वैध होईल. माननीय न्यायाधिशांनी दोन व्यावसायिक गटांचे उदाहरण दिले आहे. सोनार व वडार (पारंपारिकरित्या दगड फोडणारा) जर या दोघंनाही एकाच वर्गात घातले तर सोनारच सर्व सवलती लाटतील व वडारांना काहीच राहणार नाही. त्यामुळे शक्य असल्यास राज्य सरकारने इतर मागासवर्गीयांमध्ये सुध्दा वर्गीकरण करावे की, ज्यामुळे मागासवर्गीयांतील अधिक मागासवर्गीयांनाही त्यांचा देय असलेले लाभ मिळतील.

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग, दिल्ली यांनी केलेल्या शिफारशी

नुकतेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने अत्यंत महत्वपूर्ण शिफारस केली आहे. एल.आर.नाईक आणि मा.सर्वोच्च न्यायालय यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी ओबीसीचे विभाजन करून (१) भटक्या विमुक्त, (२) बारा बलुतेदार (न्हावी, खाटीक, वाणी, लोहार, सुतार, सोनार, शिंपी, धोबी) आणि (तेली, माळी, कोळी, गोवारी, धनगर) आणि (३) केंद्रीय सूचीमधील उरलेले इतर मागसवर्ग. असे विभाजन २७ टक्के

आरक्षणाचे करावे अशी शिफारस केली आहे. आणि गेले २० वर्ष आमची विभाजनाची तीच मागणी आहे.

वरीलप्रमाणे केंद्र सरकारने जर निर्णय घेतला तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात जसे अ, ब, क अशी वर्गवारी करून वेगळे आरक्षण दिले आणि सामाजिक न्याय दिला तसाच न्याय या सर्व समाज घटकांना मिळणार आहे. ९:९:९ टक्के वर्गवारी करण्याचा निर्णय झाल्यास या दशकातील सर्वात मोठा सामाजिक न्यायाचा प्रश्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षी सुटेल अशी आशा आहे. कारण देशभरातील ६६६ भटके विमुक्त (अंदाजे २२ करोड) आणि ५४० अत्यंतीक मागास जाती (अंदाजीत १८ करोड) असे एकूण ४० करोड लोकांचा हा प्रश्न आहे. यासाठी २७ मार्च २०१६ रोजी जंतरमंतर, दिल्ली येथे महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या झोपलेल्या जाती जाग्या झाल्यास सरकारची झोप उडाल्याशिवाय राहणार नाही असा मला विश्वास वाटतो.

म्हणून परत एकदा मंडल आयोगाचा आढावा घेणे आवश्यक झाले आहे. हाच धागा पकडून राष्ट्रीय स्वंयम सेवक संघाचे प्रमुख मोहनजी भागवत यांनीही आरक्षणाचा आढावा घेणे आवश्यक आहे, असे म्हटले असेल.

*please visit www.haribhaurathod.org*

*Mob 09920716999*

- हरिभाऊ राठोड -
माजी खासदार तथा आमदार